मासिक
# स्वराज दुनिया

संपादक : शिवाजी बबन खेडकर मो. नं. ८०५५७२२११०

■ RNI No. : MAHMAR/2024/89748
■ DECL NO : SDM/SR/06/2024 Dt. : 16/02/2024
■ unoindia1977@gmail.com

■ वर्षे २ रे ■ अंक ४ ■ जून २०२५ ■ मुल्य : २५ रु ■ वार्षिक वर्गणी : २५० रु. ■ पान ४

## ३१ ऑक्टोबर २०२६ ला कुंभमेळा पर्वाला सुरुवात

**नाशिक :** नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन करण्यात आले असून, आज झालेल्या बैठकीत कुंभमेळ्याच्या पर्वापासून शाही स्नानापर्यंत तारखा निश्चित करण्यात आल्या. त्यानुसार ३१ ऑक्टोबर २०२६ पासून कुंभमेळा पर्वाला सुरुवात होणार आहे. या दिवशी ध्वजारोहण शुभारंभ होणार असून, दुपारी १२ वाजता रामकुंडावर हा सोहळा पार पडणार आहे. तसेच साधुग्राममध्ये २४ जुलै २०२७ रोजी आखाडा ध्वजारोहण होणार असून २४ जुलै २०२८ पर्यंत कुंभमेळा पूर्व सुरू राहणार आहे. यासोबतच सिंहस्थ कुंभमेळ्यातील शाही स्नानाच्या तारखाही जाहीर केल्या असून, २ ऑगस्ट २०२७ रोजी पहिले शाही स्नान होणार आहे.

नाशिकच्या जिल्हाधिकारी कार्यालयात या विषयीची बैठक झाली. या बैठकीत आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यातील अमृत स्नान, शाही स्नानाच्या तारखा जाहीर करण्यात आल्या. साधू महंत या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार २९ जुलै २०२७ रोजी नगर प्रदक्षिणा होईल तर पहिले अमृतस्नान हे सोमवार, दि. २ ऑगस्ट २०२७ रोजी पहिले शाही स्नान होणार आहे. यासोबतच दुसरे अमृतस्नान ३१ ऑगस्ट २०२७ रोजी होणार आहे. तिसरे आणि शेवटचं अमृतस्नान हे ११ सप्टेंबर २०२७ रोजी नाशिक येथे आणि २४ जुलै २०२८ रोजी सिंहस्थ कुंभमेळ्याचा ध्वज खाली उतरवण्यात येईल. या दिवशीपर्यंत कुंभमेळा सुरू राहील, असे सांगण्यात आले.

## राज्यभरात करोनाचे सर्वाधिक रुग्ण पुण्यात!

### मुंबई, पिंपरी-चिंचवडसह इतर ठिकाणीही संसर्गात मोठी वाढ

**पुणे :** राज्यातील करोना रुग्णसंख्येत मोठी वाढ झाली असून, गेल्या २४ तासांत ६५ रुग्ण आढळले आहेत. त्यात पुण्यात सर्वाधिक २५ रुग्ण असून, त्याखालोखाल मुंबईत २२ रुग्णांची नोंद झाली आहे. राज्यात या वर्षातील करोनाची एकूण रुग्णसंख्या ८१४ वर पोहोचली आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात गेल्या २४ तासांत करोनाचे ६५ रुग्ण आढळले. त्यात पुणे महापालिका २५, मुंबई २२, ठाणे महापालिका ९, पिंपरी-चिंचवड महापालिका ६, कोल्हापूर महापालिका २ आणि नागपूर महापालिका १ अशी रुग्णसंख्या आहे. राज्यात १ जानेवारी ते १ जूनपर्यंत ११ हजार ५०१ संशयित करोना रुग्णांच्या चाचण्या करण्यात आल्या. त्यात ८१४ रुग्णांना करोनाचे निदान झाले. त्यात मुंबईत सर्वाधिक ४६३ रुग्णांची नोंद झाली आहे. राज्यातील करोनाची सक्रिय



रुग्णसंख्या ५०६ असून, ३०० रुग्ण बरे झाले आहेत.

राज्यात जानेवारीपासून आतापर्यंत करोनाच्या ८ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. यातील सात रुग्ण सहव्याधीग्रस्त होते. त्यातील एका रुग्णास मूत्रपिंडविकारासह चेताविकार होता, तर दुसऱ्या रुग्णास कर्करोग होता. तिसऱ्या रुग्णास ब्रेन स्ट्रोक आला होता आणि त्याला अपस्माराचा आजार होता. चौथ्या रुग्णास गंभीर स्वरूपाचा मधुमेहाचा आजार होता. पाचव्या रुग्णास फुफ्फुसाचा आजार होता. सहाव्या रुग्णास मधुमेहासह अर्धांगवायू झाला होता. सातव्या रुग्णास गंभीर स्वरूपाचा श्वसनविकार होता तर आठव्या रुग्णास ताप आणि धाप लागणे अशी लक्षणे होती, असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

---

## रायगड किल्ल्यावर उत्खननात आढळले सौम्ययंत्र खगोलशास्त्रीय उपकरण

**कोल्हापूर :** दुर्गराज रायगडाचे बांधकाम करताना खगोलशास्त्रीय अभ्यास करून तत्कालीन अत्याधुनिक आणि शास्त्रोक्त पद्धतीचा वापर झाल्याचा महत्वाचा पुरावा उघड झाला. रायगड विकास प्राधिकरणचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती यांनी रविवारी सोशल मिडियावरुन ही माहिती जाहीर केली.

दुर्गराज रायगड येथे भारतीय पुरातत्त्व विभाग व रायगड विकास प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या उत्खनन प्रक्रियेमध्ये गडावर प्राचीन हे 'यंत्रराज सौम्ययंत्र' हे खगोलशास्त्रीय उपकरण सापडले आहे.

भारतीय पुरातत्व विभाग आणि रायगड विकास प्राधिकरणाकडून गेल्या तीन ते चार वर्षापासून रायगडाच्या रोपवे अप्पर स्टेशनची मागील बाजू, कुशावर्त तलाव, बाजारपेठ, जगदीश्वर मंदिर या भागांमधे जे शिवकालीन वाड्यांचे अवशेष आहेत, अशा जवळपास १० ते १२ विविध ठिकाणी हे उत्खनन सुरु होते. कुशावर्त तलावाच्या वरील भागात तसेच पर्जन्यमापक आणि वाडेश्वर मंदिराच्या मध्यभागात असलेल्या ऐतिहासिक वाड्याच्या जागेवर उत्खनन करताना हे यंत्रराज, सौम्ययंत्र खगोलशास्त्रीय उपकरण सापडले.

दुर्गराज रायगडाचे बांधकाम करताना खगोलशास्त्रीय अभ्यास करण्यासाठी या यंत्राचा वापर झाला असण्याची शक्यता आहे. या अमूल्य ठेवल्यामुळे इतिहास अभ्यासकांना पुढील संशोधनासाठी खूप मोठी संधी उपलब्ध झाली आहे. -संभाजीराजे छत्रपती, अध्यक्ष, रायगड विकास प्राधिकरण.

या यंत्राजवरच्या वरील बाजूस काही अक्षरे कोरलेली आहेत. मध्यभागी एक कासव, सापासारख्या दोन प्राण्यांचे छाप आहेत. त्यांचे मुख आणि शेपटी कुठल्या दिशेला असावी, हे समजण्यासाठी वरील बाजूस मुख आणि पूंछ अशी अक्षरे सुद्धा कोरलेली आहेत. यावरून उत्तर आणि दक्षिण दिशा कुठे असावी, याचा अंदाज बांधला जात होता.

**दिशांचा वेध घेण्याचे यंत्र**

प्राचीन कालखंडापासून ग्रहताऱ्यांच्या अभ्यासासाठी, दिशांचा वेध घेण्यासाठी तसेच वेळ मोजण्यासाठी अस्ट्रोलॅब म्हणजे प्राचीन यंत्रराज, सौम्ययंत्र हे खगोलशास्त्रीय उपकरण वापरले जात होते. विशेषतः अक्षांश, रेखांश, कर्कवृत्त, विषुववृत्त यांसारख्या गोष्टींचा अभ्यास करणे यामुळे सोपे जात असे.

## व्यावसायिक गॅस २४ रुपयांनी स्वस्त

**नवी दिल्ली :** रविवार दि. १ जूनपासून देशभरात एलपीजी सिलिंडरच्या किमती कमी झाल्या आहेत. तेल विपणन कंपन्यांनी (ओएमसी) गॅस सिलिंडरच्या किमतीत मोठी कपात केली आहे. यामुळे आता १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडरच्या किमती सुमारे २४ रुपयांनी कमी झाल्या आहेत. रेस्टॉरंट्स, हॉटेल्स आणि ढाबे आदींना याचा फायदा होईल. कारण येथे हे सिलिंडर मोठ्या प्रमाणावर वापरले जातात.

या व्यावसायिक सिलिंडरच्या किमती कमी झाल्याने, व्यवसायासाठीचा खर्च कमी होईल. परिणामी ग्राहकांना चांगली सेवा मिळू शकेल. महत्वाचे म्हणजे, घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**एप्रिल आणि मे महिन्यातील दर**

खरे तर, या व्यावसायिक सिलिंडरचे दर सलग तिस-या महिन्यात कमी झाले आहेत. यापूर्वी मे महिन्यात १४.५ रुपयांनी तर एप्रिल महिन्यातही ४१ रुपये या सिलिंडरचे दर कमी करण्यात आले होते.

---

## राज्यात पावसाची गती मंदावली

■ **पाऊस घेणार ब्रेक कृषी विभागाचा शेतक-यांना महत्वाचा सल्ला**

**पुणे :** महाराष्ट्रात यंदा मान्सून वेळेपूर्वीच दाखल झाला. मे महिन्यात राज्यात मान्सून पोचण्याचा विक्रम झाला. तसेच मे महिन्यात मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे नदी, नाले दुथडी भरुन वाहू लागले. परंतु आता राज्यात पावसाची गती मंदावली आहे. पुढील १२ जूनपर्यंत पाऊस विश्रांती घेण्याची शक्यता आहे. मुंबईत शनिवारी रात्री पावसाच्या तुरळक सरी पडल्या. मात्र, रविवार वातावरणात पावसाची चिन्ह नव्हती.

राज्यात मान्सूनने जोरदार सुरुवात केली असली तरी आता त्याची गती मंदावली आहे. नैऋत्य मोसमी वा-यांनी यंदा वेगाने वाटचाल करत देशात लवकर आगमन केले. २६ मे रोजी राज्यात दाखल झालेल्या पावसाने कोकण, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात दमदार हजेरी लावली. मात्र, गेल्या चार दिवसांपासून अनेक भागांत पावसाने विश्रांती घेतली आहे.

हवामान खात्याच्या माहितीनुसार, सध्या मान्सूनचे प्रवाह कमकुवत झाले आहे. त्यामुळे राज्यात पावसाचे प्रमाण कमी होणार आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रात तुरळक ठिकाणीच हलक्या सरी पडणार आहेत. विदर्भात काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज आहे. काही जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. राज्यात मे महिन्यात मुसळधार पाऊस झाला. पण गेल्या ४८ तासांपासून मान्सून थांबला आहे. मुंबई, पुणे, कोकण या भागात पाऊस नाही. यामुळे गेल्या तीन दिवसांपासून कमाल तापमानात वाढ झाली आहे. तापमान २२ अंशावरून ३२ ते ३८ अंशावर गेले आहे.

**अजून पेरणीची घाई नको**

कृषी विभागाने शेतक-यांना सध्या पेरणीची घाई न करण्याचा सल्ला दिला आहे. कारण पुढील काही दिवसांत मान्सूनची प्रगती संथ राहण्याची शक्यता आहे. मात्र १२ जूननंतर पुन्हा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. हवामान विभागाच्या सरकारी दप्तरात मान्सून हंगामाचा पाऊस एक जून पासून नोंदवण्यास सुरुवात होते. १ जूनपासून ३० सप्टेंबरपर्यंत पडलेला पाऊस मान्सूनचा पाऊस म्हणून नोंदवला जातो.

## पूर आणि भूस्खलनामुळे आतापर्यंत ३० जणांचा मृत्यू

■ **आसाम ते सिक्किमपर्यंत जल प्रलय**

**नवी दिल्ली :** मागील काही दिवसांपासून सातत्याने होणा-या पावसामुळे भारताच्या पूर्वे कडील राज्यांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. पुरामुळे रस्ते वाहतूक, रेल्वे आणि इतर सेवांवरही परिणाम झाला आहे. आसाम, त्रिपुरा, सिक्किम आणि अरुणाचल प्रदेशमध्ये पुरामुळे आतापर्यंत ३० जणांचा मृत्यू झाला आहे. भारतीय हवामान खात्याने पश्चिमी त्रिपुरा आणि खोवाई भागात रेड अलर्ट जारी केला आहे. त्याशिवाय भूस्खलन, पीकांचे नुकसान आणि वीज पुरवठा खंडीत होण्याची शक्यता वर्तवली आहे.

त्रिपुरात मुसळधार पाऊस पडत असून याठिकाणी १३०० कुटुंबांना सुरक्षित स्थळी नेण्यात आले आहे. इम्फालमध्ये सुरक्षा जवान पाऊस आणि पुरात अडकलेल्या नागरिकांच्या मदतीला तैनात आहे. केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी आसाम, मणिपूर, सिक्किम, अरुणाचल प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांकडून परिस्थितीचा आढावा घेतला आहे. कुठल्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन केंद्राने राज्याला दिले आहे. आसाममध्ये पूर आणि भूस्खलनामुळे आतापर्यंत ८ जणांचा मृत्यू झाला आहे.

पुरामुळे १५ जिल्ह्यातील ७८ हजार नागरिकांवर परिणाम झाला आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिसवा हे अमित शाह यांच्या संपर्कात आहेत. राज्यातील परिस्थितीबाबत त्यांनी गृहमंत्र्यांना माहिती देत मदतीची विनंती केली आहे. केंद्रानेही राज्य सरकारला मदतीचे आश्वासन दिल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या सोशल मीडिया खात्यावरून दिली आहे.

दरम्यान, रविवारी संध्याकाळी अचानक राजधानी दिल्लीतही वातावरणात बदल पाहायला मिळाला. दिल्ली आणि आसपासच्या परिसरात ढगाळ वातावरण निर्माण झाले. ज्यातून वादळ आणि पावसाची स्थिती आली. दिल्लीत हवामान खात्याने यलो अलर्ट जारी केला आहे. पुढील काही तासांत दिल्लीत वादळी वा-यासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दिल्लीत ४ जूनपासून मान्सून सुरू होईल असे हवामान खात्याने म्हटले होते. परंतु त्याआधीच वातावरणात बदल पाहायला मिळाला आहे.

# संपादकीय

## पेरावं की थांबावं.?

'जगावं की मरावं' असा प्रश्न 'नटसम्राटा'ला पडला होता, तशीच काहीशी दोलायमान परिस्थिती सध्या शेतक-याची झाली आहे. शेतीसाठी अनुकूल हवामान अत्यंत आवश्यक असते. मात्र, गत काही वर्षांत हवामानातील अनिश्चिततेमुळे शेतक-यांचे गणित वारंवार चुकत आहे. यंदा तर त्याचा कहर झालेला दिसतो. मे महिन्यात अवकाळी पावसाने दमदार हजेरी लावल्याने काही भागात ढगफुटीसदृश पाऊस, गारपीट तर काही भागात वादळवा-याने पिकांचे अतोनात नुकसान केले. हवामानातील या बदलामुळे शेतकरी गोंधळून गेला आहे. पारंपरिक पद्धतीनुसार मे अखेरपर्यंत शेतकरी पेरणीसाठी मशागतीत मग्न असतो. परंतु यंदा एप्रिल अखेरपासूनच अवकाळी पावसाने थैमान घालण्यास सुरुवात केल्याने शेतक-याला शेतीची मशागत करण्यास वेळच मिळाला नाही. शेतात कमालीचा ओलावा असल्याने नांगरणी करता आली नाही. हवामान खात्याचे अंदाजही अनेकवेळा चुकीचे ठरतात, त्यामुळे अचूक निर्णय घेणे शेतक-यांना अवघड जाते. तो कायम द्विधा मन:स्थितीत असतो. या पार्श्वभूमीवर कृषि विभाग, कृषि विद्यापीठ व सरकारने शेतक-यांना योग्य वेळी अचूक आणि त्या त्या भागातील हवामानानुसार सल्ला देणे ही काळाची गरज आहे. शेतक-यांच्या हतबलतेचा फायदा घेऊन बोगस बियाणे, खते विक्री करणा-या टोळ्याही सक्रिय होतात. सरकारने त्यांचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे. तसेच शेतक-यांना विश्वासार्ह मार्गदर्शन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अवकाळी पाऊस केवळ एक हवामान घटक नसून तो शेतक-यांच्या कष्टांवर, भविष्यावर आणि स्वप्नांवर परिणाम करणारा महत्त्वाचा मुद्दा आहे. सध्या शेतक-यासमोर 'पेरावं की थांबावं' असा गहन प्रश्न उभा आहे. त्याचे उत्तर देण्यासाठी हवामानावरील संशोधन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शाश्वत कृषि धोरण राबवायची गरज आहे. 'नेमेचि येतो मग पावसाळा' ही म्हण आता वापरून गुळगुळीत झाली असली तरी सरकार आणि प्रशासन त्यापासून बोध कधी घेणार हा प्रश्न अनुत्तरितच आहे. देशाची आर्थिक राजधानी आणि जागतिक दर्जाच्या शहरातील सर्व सेवा-सुविधा पहिल्याच पावसात कोलमडून पडत असतील तर असे का होते आणि याला जबाबदार कोण? हा प्रश्न उपस्थित होतो. कोट्यवधी रुपये खर्च करूनही मुंबईतील नालेसफाई झालीच नाही. फक्त या कामाची पाहणी करून फोटो काढले गेले. पण ही कामे कशी होतात, त्यात किती भ्रष्टाचार होतो हे कॅमे-यात कैद झालेच नाही. पावसावरून सत्ताधारी व विरोधकांत राजकारण सुरू होते. भाजप आणि शिंदे गट मुंबई महानगरपालिकेत २५ वर्षे सत्तेत असणा-या शिवसेनेला (उबाठा) दोष देत आहेत. पण ज्यावेळी ते सत्तेत एकत्र होते, तेव्हा गप्प का होते? मुंबई महापालिकेवर प्रशासन असो की राजकीय पक्षाची सत्ता, मुंबईकरांचे हाल होणे काही थांबत नाही. २६ जुलै २००५ रोजी आलेल्या पुराचा भयानक अनुभव अजूनही ताजा आहे. परंतु त्यापासून सरकार आणि प्रशासनाने काहीच बोध घेतलेला नाही. दरवर्षी पर्जन्यवृष्टी एक नवीन धडा शिकवून जाते, पण त्यातून सरकार आणि प्रशासन काही बोध घेताना दिसत नाही, ते कधी दिसेल? राज्यात यंदा मान्सूनने १२ दिवस आधीच हजेरी लावली. उत्तर महाराष्ट्रात पावसाने धुमाकूळ घातला. गत ४-५ दिवसांपासून राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत जोरदार पाऊस पडत आहे. २६ मे रोजी मान्सून राज्यात दाखल झाल्यानंतर आता तो सर्वच भागात पसरला आहे. पुढील काही दिवसांतील पावसाच्या प्रवासाबाबत पुणे वेधशाळेने म्हटले आहे की, बंगालच्या उपसागरात तयार झालेला कमी दाबाचा पट्टा आता उत्तरेला सरकल्यामुळे महाराष्ट्रात पुढील पाच ते सहा दिवसांत पाऊस विश्रांती घेण्याची शक्यता आहे. ३० मे नंतर मान्सूनचा प्रवास ओसरण्याची शक्यता आहे. नागपूर वेधशाळेने म्हटले आहे की, दोन दिवसांत पूर्व विदर्भात मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. मात्र, ३० मे नंतर पावसाचा जोर कमी होऊ शकेल. पुढील दोन दिवसांत पावसाचा प्रवास थंडावणार असल्यामुळे शेतक-यांनी पेरणीची घाई करू नये. १०० मिमी पाऊस होईपर्यंत शेतक-यांनी पेरणी करू नये, असे हवामान विभागाने म्हटले आहे. यंदा सरासरीपेक्षा अधिक पाऊस कोसळेल असा अंदाज आहे. यावेळी ११० टक्क्यांच्या जवळपास पावसाचे प्रमाण राहू शकते, तसेच देशाच्या दक्षिण आणि मध्य भागात अधिक पाऊस होण्याची शक्यता आहे. पहिल्याच पावसाने राज्यातील अनेक जिल्ह्यांत मोठे नुकसान केले आहे. आता मान्सून मराठवाडा आणि विदर्भात पोहोचला आहे. दोन्ही भागात मुसळधार पाऊस होईल असा अंदाज आहे. पुढील पाच दिवस मुसळधार पावसाचे आहेत. मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात मान्सूनपूर्व पाऊस विश्रांती घेण्याची शक्यता आहे. मुंबई, कोकण, नगर, पुणे, नाशिक या भागात पावसाचे प्रमाण जास्त राहील. बाकी विभागात १ ते ६ जूनपर्यंत सूर्यदर्शन होईल. त्यावेळी शेतक-यांनी नांगरणी, वखरणीची कामे उरकून घ्यावीत आणि पुढे जमिनीत पुरेसा ओलावा आल्यानंतरच पेरणीचा निर्णय घ्यावा असे हवामान अभ्यासकांनी म्हटले आहे. महाराष्ट्रात ३० मे पासून पुढील पाच ते सहा दिवस मोसमी वा-यांचा वेग मंदावणार आहे. वा-यांचा प्रवास अतिशय मंदगतीने होत राहील. त्यामुळे राज्यात काही दिवस पाऊस विश्रांती घेण्याची शक्यता आहे. पावसात सातत्य राहणार की खंड पडणार याकडे सध्या शेतक-यांचे लक्ष आहे. कृषि विभागाने मात्र पेरणीची घाई करू नये असा सल्ला दिल्याने गोंधळ वाढला आहे. राज्याच्य कृषि विभागाने यंदा मोसमी पावसाचा हंगाम लवकर सुरू झाला असला तरी पेरणीची घाई करू नये असा सल्ला दिला आहे. याचा अर्थ पावसाचा खंड पडू शकतो. खरीप हंगामासाठी एप्रिलमध्ये तयारी सुरू होते. परंतु यंदा या कालावधीतच पाऊस सुरू झाल्याने शेतक-यांना मशागतीची संधीच मिळाली नाही. साधारण पेरणीलायक पाऊस हा विदर्भात १३ जून, मराठवाड्यात २१ जून आणि उत्तर महाराष्ट्रात १७ जूनपासून अपेक्षित आहे. त्यामुळे सध्या जगाच्या पोशिंद्यासमोर 'पेरावं की थांबावं' असा प्रश्न आहे.

## कशी केलीस दैना!

नियोजित वेळेच्या आधी १६ दिवस महाराष्ट्रासह मुंबईत मान्सूनचा पहिला पाऊस धोधो बरसल्याने मुंबईकरांची त्रेधातिरपीट उडाली. मुंबईची तुंबई झाली. जिकडेतिकडे पाणीच पाणी झाल्याने नागरिकांची 'आता जाऊ कुणीकडे' अशी स्थिती झाली. मोसमी पाऊस तळकोकणात दाखल झाला असला तरी उत्तर कोकणातील रायगड, मुंबई, ठाणे जिल्हे आणि पश्चिम महाराष्ट्रात सोमवारी पूर्व मोसमी पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या जिल्ह्यांना पावसाने जोरदार तडाखा दिला. त्यामुळे भीमा, नीरा, बाणगंगा या नद्यांना पूर आला. चंद्रभागेस पूर आल्याने पंढरपूरमध्ये दक्षतेचे आदेश देण्यात आले. सातारा आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील दुष्काळी पट्ट्यातही पावसाने धुमाकूळ घातला. कोकणातील कुंडलिका, पाताळगंगा, सावित्री या नद्यांच्या पातळीत वाढ झाली. मुंबईत रविवारी रात्रीपासूनच सुरू झालेल्या पावसाने संततधार कायम ठेवत मुंबईची दाणादाण उडवली. पहिल्याच पावसात मुंबईची दैना झाली. रस्तेवाहतुकीचा बोजवारा उडाला, तर मध्य रेल्वेला जोरदार फटका बसला. हार्बर रेल्वेसेवा सीएसएमटी ते वडाळापर्यंत दुपारपर्यंत ठप्प होती. राज्यात पहिल्याच पावसाने दोन बळी घेतले. मुंबईत मे महिन्यात १०० वर्षांतील सर्वाधिक पावसाची नोंद झाली. इतिहासात मंत्रालयात प्रथमच पाणीच पाणी झाले,

तर काही दिवसांपूर्वीच उद्घाटन करण्यात आलेल्या वरळीतील आचार्य अत्रे चौक हे भूमिगत मेट्रो स्थानक जलमय झाले. मुंबईतील महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक असलेल्या भुयारी मेट्रोच्या कामाची पहिल्याच पावसाने पोलखोल केली. ॲक्वा मार्ग-३ला पावसाचा फटका बसला. आचार्य अत्रे चौक वरळी मेट्रो स्थानकाच्या आत पावसाचे पाणी शिरले. भुयारी मेट्रो मार्गाच्या पाय-यांवरूनही पाणी वाहू लागल्याने हे मेट्रो स्थानक आहे की धबधबा असा प्रश्न निर्माण झाला. मुंबईत अनेक ठिकाणी रस्ते जलमय झाले, झाडे कोसळली. राज्याचा कारभार चालणा-या मंत्रालयात इतिहासात प्रथमच गुडघाभर पाणी तुंबल्याने एकच तारांबळ उडाली. मंत्रालयात पाणी शिरल्याने महायुतीच्या कारभारावर ताशेरे ओढले गेले. मुंबईत १८ ठिकाणी शॉर्टसर्किटच्या घटना घडल्या. ३२ ठिकाणी झाडे कोसळली तर पाच ठिकाणी भिंत कोसळण्याच्या घटना घडल्या. मान्सूनचा तडाखा मुंबई, पुणे, सोलापूर, कर्नाटकातील कलबुर्गी, तेलंगणातील मेहबूबनगर आणि आंध्र प्रदेशातील कावलीपर्यंत बसला आहे. पुढील तीन दिवसांत मान्सून महाराष्ट्राच्या ब-याच भागात तसेच कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, बंगालचा उपसागर आणि ईशान्य भारतात आणखी वेगाने पुढे सरकेल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. पावसाने निर्माण झालेल्या परिस्थितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्यपूर्णरीत्या आढावा घेत आहेत.

नागरिकांना मदत करण्यासाठी संपूर्ण प्रशासनाला अलर्ट मोडवर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मान्सूनचे केरळात १ जूनला तर मुंबईत १० जूनपर्यंत आगमन होईल अशी अपेक्षा होती. परंतु अनुकूल वातावरणीय परिस्थितीमुळे आठ दिवस आधीच केरळात मान्सूनचे आगमन झाले आणि अवघ्या २४ तासांत वा-याच्या वेगाने मान्सून महाराष्ट्रात पोहोचला. त्यामुळे मुंबईची अक्षरश: दाणादाण उडाली. मान्सूनचे आगमन जवळपास दहा ते बारा दिवस आधी झाल्याने मुंबई, कोकणसह महाराष्ट्रातील अनेक भागात पावसाने दमदार हजेरी लावली. ऐन मे महिन्यात पाऊस आल्याने पावसाळ्याच्या जून-जुलै महिन्यात पाऊस असेल की नाही अशी शंका आतापासूच व्यक्त केली जात आहे. हवामान खाते पाऊस येणार असे सांगते आणि नंतर पाऊस येत नाही असा आजवरचा अनुभव होता. परंतु यावेळी मान्सून लवकर दाखल झाला, मग तो आता लवकर जाणार का अशी शंका व्यक्त केली जात आहे. यावर हवामानतज्ज्ञ कृष्णानंद होसाळीकर म्हणाले, पाऊस म्हणजे नळ नाही नळ चालू केला की पावसाला सुरुवात आणि बंद केला की पाऊस बंद असे होत नाही. पावसासाठी समुद्रात निर्माण होणारी स्थिती आणि भौगोलिक स्थिती या दोन्ही गोष्टी आवश्यक असतात. वेळेआधी आलेला पाऊस आणि त्याच्या पीछेहाटीचा तसा कोणताही संबंध नाही. पावसाचा वेग विविध स्थितीवर अवलंबून असतो. पावसाचा आवेग ओसरला की, कदाचित एक-दोन दिवस तो पडणारही नाही.

पण पुन्हा पावसासाठी पोषक स्थिती निर्माण झाली की पावसाचा जोर वाढेल. यंदा मोसमी वा-यांनी अत्यंत वेगाने केलेली वाटचाल दुर्मिळ असल्याचे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. गत काही वर्षांत पाऊस येण्याचे निकष बदलले आहेत, पावसाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला आहे. पूर्वी उपग्रह नसताना अंदाज वर्तवण्याचे स्वरूप मर्यादित होते, आता उपग्रहामुळे अंदाज वर्तवण्याची क्षमता वाढली आहे. गत आठ वर्षे पाऊस सर्वसाधारण होता. त्यामुळे यंदा आलेला पाऊस लवकर वाटतो आहे. पाऊस लवकर आला म्हणजे फार काही वेगळे घडले असे नाही. यापूर्वी अशा घटना घडलेल्या आहेत. केरळमध्ये मोसमी वारे दाखल झाल्यानंतर महाराष्ट्रात येण्यासाठी आठ-दहा दिवस लागतात हे आपण माणसांनी ठरवले आहे. मात्र, निसर्गाची अनेक रहस्ये अजून उलगडलेली नाहीत. निसर्ग माणसांच्या नियमांनी चालत नाही, म्हणूनच दरवर्षी वेगळी करामत दिसून येते. त्याप्रमाणे पाऊस लवकरही येऊ शकतो हे निसर्गाने दाखवून दिले आहे. अंदाज वर्तवण्यात आव्हाने आहेत, ती असलीच पाहिजेत, त्यातूनच नवे काही शिकता येते, नवे काही घडू शकते. २७ मे पासून मान्सूनच्या प्रवासाची गती कमी होईल असा अंदाज आहे. राज्यातील हवामान हळूहळू कोरडे होईल आणि काही प्रमाणात तापमानात वाढ होईल. मे महिन्याच्या शेवटपर्यंत कोकण वगळता बहुतांश भागात हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. ५ जूनपर्यंत ही स्थिती कायम राहील असा अंदाज आहे.

देशातील इतर भागातसुद्धा मान्सूनचा प्रवास तात्पुरता थांबू शकतो. आपल्या भागात मान्सून लवकरच दाखल होईल अशी अपेक्षा करून अथवा खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवून शेतक-यांनी पेरणीची घाई करू नये. कारण हवामान कोरडे होण्याची शक्यता असल्याने पेरणीची घाई केली तर शेतक-यांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे कृषी विभागाने म्हटले आहे. नाहीतरी ब-याच ठिकाणी मशागतीची कामेच झाली नाहीत, त्यामुळे पेरणी करणे शक्य होणार नाही. असो. सध्या तरी पर्जन्यजोरामुळे 'कशी केलीस माझी दैना' असे म्हणावे लागत आहे.

## आला रे, आला.!

मोसमी पाऊस शनिवारी केरळमध्ये दाखल झाल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. बळिराजासाठी ही आनंदवार्ता आहे. गत दोन दिवसांपूर्वी मोसमी वा-यांची वाटचाल केरळच्या दिशेने होण्यास पोषक वातावरण असल्याचे जाहीर करण्यात आले होते. यंदा मोसमी वारे केरळमध्ये सरासरी वेळेच्या ८ दिवस आधी आणि मागील १६ वर्षांच्या तुलनेत लवकर दाखल झाले आहेत. पोषक वातावरण असल्यामुळे यंदा मोसमी वारे अंदमानमध्येही लवकर दाखल झाले होते. नेहमीच्या वेळेआधीच म्हणजे १३ मे रोजी मोसमी वारे दक्षिण बंगालचा उपसागर, निकोबार बेटे आणि दक्षिण अंदमान समुद्रात दाखल झाले होते. त्यानंतरही पोषक वातावरण असल्याने मोसमी वा-यांची वाटचाल जलद गतीने सुरू होती. मोसमी वारे केरळमध्ये २७ मे रोजी दाखल होण्याचा हवामान विभागाचा अंदाज होता. मात्र अंदाजित वेळेच्या आधी एक दिवस आधीच मोसमी वारे केरळमध्ये दाखल झाल्याचे हवामान विभागाने जाहीर केले.

मोसमी वा-यांनी शनिवारी संपूर्ण केरळ आणि तामिळनाडूचा बहुतांशी भाग व्यापून कर्नाटकच्या काही भागापर्यंत प्रगती केली आहे. याबरोबरच दक्षिण अरबी समुद्राचा संपूर्ण भाग, संपूर्ण लक्षद्वीप बेटे, पूर्व मध्य बंगालच्या उपसागराचा संपूर्ण भाग, उत्तर बंगालच्या उपसागराचा काही भाग तर मिझोरामच्या काही भागात मोसमी पाऊस एक दिवस आधीच दाखल झाला. मोसमी वा-यांनी शनिवारी गोव्यापर्यंत मजल मारली. पुढील दोन ते तीन दिवसांत मोसमी वारे संपूर्ण गोवा व्यापून महाराष्ट्रात दाखल होतील, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने व्यक्त केला आहे. केरळमध्ये मोसमी पाऊस सामान्यत: १ जूनच्या आसपास दाखल होतो. भारतीय हवामान विभागाच्या अधिकृत तारखेनुसार म्हणजेच १ जूनपूर्वी पाच दिवस आधी किंवा नंतर म्हणजे २७ मे ते ५ जून दरम्यान पावसाचे आगमन होते. यानंतर पाऊस हळूहळू देशभर पसरतो. यंदा नैऋत्य मोसमी वा-याच्या वाटचालीसाठी पोषक स्थिती निर्माण झाल्यामुळे मोसमी पाऊस वेळेत केरळमध्ये दाखल होईल, असे भारतीय हवामान विभागाने म्हटले होते. त्यानुसार केरळमध्ये शनिवारी मोसमी पाऊस दाखल झाला आहे. गतवर्षी १९ मे रोजी अंदमान-निकोबार बेटांवर नैऋत्य मोसमी वा-यांनी धडक दिली होती. त्यानंतर नियोजित वेळेआधी म्हणजे ३० मे रोजी मोसमी पाऊस केरळमध्ये दाखल झाला होता. यापूर्वी २३ मे २००९ रोजी मोसमी पाऊस केरळमध्ये दाखल झाला होता. त्यानंतर तब्बल १६ वर्षांनी शनिवार, २४ मे रोजी मोसमी पाऊस वेळेआधी केरळमध्ये दाखल झाला आहे. आता राज्यातील काही भागात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. अरबी समुद्रातील कमी दाब क्षेत्राची तीव्रता वाढल्यामुळे राज्यात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग तसेच कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्यांच्या घाटमाथ्यावर काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. मुंबई, ठाणे, पालघर, पुणे, नांदेड, लातूर, चंद्रपूर आणि नागपूर जिल्ह्यात काही ठिकाणी जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच उर्वरित भागात वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. राज्यात सुरू असलेल्या अवकाळी पावसाचा कहर ३० मे पर्यंत कायम राहणार आहे. राज्याच्या सर्वच भागात गत आठ दिवसांपासून मध्यम ते मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. मान्सूनच्या पावसामुळे शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढते, भूजल आणि जलाशयांचे पुनर्भरण होते आणि खरीप हंगामातील पिकांना मोठा फायदा होतो. यंदा आयएमडीने सरासरीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज वर्तवला आहे. ज्यामुळे खरीप हंगामात पिकांचे विक्रमी उत्पादन होण्याची शक्यता आहे. याचा थेट परिणाम देशाच्या शेती उत्पादनावर आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होईल. मान्सूनचा प्रवास वेगवान असल्याने कोकण किनारपट्टीवर ३१ मे ते २ जून पर्यंत पाऊस पोहोचेल. मुंबईतही याच कालावधीत मान्सूनच्या पहिल्या सरी कोसळण्याची शक्यता आहे. १९ मे पासून कोकण आणि मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा जोर वाढला आहे, जो मान्सूनपूर्व पावसाचा भाग आहे. मध्य महाराष्ट्रात (पुणे, नाशिक, सातारा) आणि मराठवाड्यात २ ते ५ जून दरम्यान मान्सून दाखल होण्याचा अंदाज आहे. विदर्भात मान्सून साधारणपणे ५ ते ७ जून दरम्यान पोहोचण्याची शक्यता आहे. कारण मान्सूनचा प्रवास पश्चिमेकडून पूर्वेकडे सरकतो. यंदा मान्सूनच्या हंगामात (जून ते सप्टेंबर) सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. यंदा एल निनो परिस्थितीचा प्रभाव नसल्याने मान्सूनच्या पावसाचे प्रमाण चांगले राहण्याची अपेक्षा आहे. पुढच्या दोन दिवसांतच मान्सून महाराष्ट्रात धडकण्याची शक्यता आहे. महाराष्ट्राच्या किनारपट्टी भागात पुढील ७ दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. अवकाळी पावसाचा राज्यातील ८५ तालुक्यांना फटका बसला आहे. मका, ज्वारी, भाजीपाला, संत्रा, भात, आंबा, फळपिके यांचे पावसामुळे नुकसान झाले आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत मान्सून कोकणात दाखल होण्याची शक्यता आहे. कोकणात सध्या जोरदार मान्सून पूर्व पाऊस सुरू आहे. केरळ हे मान्सूनचे भारतातील प्रवेशद्वार मानले जाते. यंदा मान्सून लवकर दाखल झाल्याने सर्वसामान्यांसह शेतक-यांमध्ये सकारात्मक चित्र आहे. केरळनंतर आता काही दिवसांत मान्सूनचा प्रवेश दक्षिण आणि मध्य भारतात होणार आहे. दक्षिण कोकण आणि गोव्याच्या समुद्रकिना-यावर कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने गत दोन दिवसांपासून या भागात प्रचंड पाऊस सुरू आहे. येत्या ३६ तासांत राज्यातील अनेक भागांमध्ये मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मराठवाड्यात लातूरसह धाराशिव, बीड, परभणी, हिंगोलीतही शनिवारपासून दमदार पाऊस झाला. लातूर जिल्ह्यात शेतपिके, फळझाडांची मोठी हानी झाली. शेतातील पिके जागेवरच नासली आहेत. राज्यात सतत पाऊस कोसळत असल्याने शेतक-यांची खरीप मशागतीची कामे खोळंबली आहेत.

printed by SHIVAJI BABAN KHEDKAR, and published by SHIVAJI BABAN KHEDKAR, Owner by SHIVAJI BABAN KHEDKAR on behalf of Marathi Magazine SWARAJ DUNIYA, printed at M/s. Shree Samarth Printers, Appa Balwant Chowk, Near Prabhat Theatre, 535, Shanivar Peth, Pune - 411030 (Maharashtra) and published at Property No. 2585, Gat No. 1026, Old Bhambarde Road, Ranjangaon Ganpati, Tal. Shirur, Dist. Pune - 412209 (Maharashtra) Editor - SHIVAJI BABAN KHEDKAR

मुद्रक शिवाजी बबन खेडकर आणि प्रकाशक शिवाजी बबन खेडकर मालक शिवाजी बबन खेडकर यांचे नावे मराठी मासिक स्वराज दुनिया, श्री समर्थ प्रिंटर्स, अप्पा बळवंत चौक, प्रभात थेअटरच्या जवळ, ५३५, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० (महाराष्ट्र). द्वारे मुद्रित करुन आणि प्रकाशन ठिकाण : प्रॉपर्टी नं. २५८५, गट नं. १०२६, जुना भांबर्डे रोड, रांजणगाव गणपती, ता. शिरूर, जि. पुणे – ४१२२०९ (महाराष्ट्र).
संपादक : शिवाजी बबन खेडकर

## सफाई कर्मचाऱ्यांना विविध योजनांचे लाभ देण्यासाठी त्यांचा डाटाबेस तयार करावा- जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

**पुणे :** सफाई कर्मचाऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देऊन त्यांची उन्नती व्हावी यासाठी त्यांची वयोगट, शिक्षण यानुसार यादी (डाटाबेस) तयार करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.

सफाई कामगारांच्या विविध अडचणी व प्रश्नांबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी समाज कल्याण सहायक आयुक्त प्रसार खैरनार, जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी ए. आर. गुजर, जिल्हा समाज कल्याण अधिकारी राधाकिसन देवढे, पुणे मनपाचे मुख्य कामगार अधिकारी नितीन केंजळे, ससून रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. यल्लापा जाधव, बै.जी. वैद्यकीय महाविद्यालयाचे श्वसनोपचार विभागाचे विभागप्रमुख डॉ. संजय गायकवाड यांच्यासह पुणे, खडकी छावणी मंडळाचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगरपालिका, पिंपरी महानगरपालिकांचे अधिकारी आदी उपस्थित होते.

सफाई कामगार आणि त्यांच्या पाल्यांच्या कल्याणासाठी काय उपाययोजना करता येतील यासाठी त्यांची निश्चित आकडेवारी असणे आवश्यक आहे. त्यानुसार सर्व रुग्णालये, नगरपालिका, महसूल कार्यालये आदी ठिकाणच्या सफाई कामगारांचे सर्वेक्षण करावे. या समाजातील तरुण पिढीला शिक्षणासाठी, युवा पिढीला विश्वकर्मा योजनेतून रोजगार आणि उर्वरितांना अन्य सामाजिक व आर्थिक सुरक्षा योजनांचा लाभ कसा देता येईल याबाबत प्रस्ताव तयार करण्यात येईल, असेही जिल्हाधिकारी म्हणाले.

ससून रुग्णालयातील सफाई कामगारांच्या वारसांच्या अनुकंपा भरतीविषयक प्रकरणे आदींवर कार्यवाही गतीने व्हावी यासाठी पुढील आठवड्यात बैठक घ्यावी. ४८ बदली कामगारांचे भरतीचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा. सफाई कामगारांचे वेतन त्यांना रोख हातात न देता त्यांच्या बँक खात्यावर दरमहा ५ तारखेच्या आत जमा करण्याच्या सूचना संबंधित कंत्राटदारांना द्याव्यात. तसेच तसे झाल्याबाबत दरमहा १५ तारखेपर्यंत बँक स्टेटमेंट मागवून खात्री करावी, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीत विविध स्वयंसेवी संघटनांचे प्रतिनिधींनी सफाई कामगारांचे प्रश्न मांडले. त्यावर सकारात्मक राहून अधिकाऱ्यांनी काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

## एमएसआरडीसीकडून राज्यात सुरू असलेल्या कामांचा वेग वाढवा

- **उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश**
- **मुंबई- नाशिक महामार्गावरील रखडलेल्या कामांना गती द्यावी**
- **कामात हयगय करणारे अधिकारी आणि कंत्राटदार यांच्यावर कठोर कारवाई करणार**

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सुरू असलेल्या विविध रस्ते विकास कामांचा वेग वाढवा, तसेच मुंबई-नाशिक महामार्गावरील शक्य तेवढी कामे मान्सूनआधी पूर्ण करावीत, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

एमएसआरडीसीच्या वतीने राज्यात सुरू असलेल्या राज्यातील विविध विकास प्रकल्पांचा त्यांनी आढावा घेतला. ही सर्व कामे दर्जेदार आणि वेळेत पूर्ण व्हावीत अशी अपेक्षा उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. बैठकीस एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड आणि अधिकारी उपस्थित होते.

मुंबई - नाशिक महामार्गाचा आढावा घेऊन महामार्गावरील रखडलेल्या कामांना गती देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिले. मान्सूनपूर्वी ज्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण पूर्ण होणार नाही त्याचे डांबरीकरण करून रस्ता वाहतूक करण्यास योग्य बनवावा, या मार्गावरील ३१ किलोमीटरचे काँक्रीटीकरण होणे अद्यापही बाकी आहे, तसेच पिंपळास चारोटी, रेल्वे ओव्हर ब्रिज येथील काम रखडले आहे या कामांना तत्काळ गती द्यावी, कंत्राटदार ही कामे वेळेत पूर्ण करण्यास हयगय करत असल्यास त्यालाही नोटीस पाठवून ताकीद द्यावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

रेल्वे पुलाच्या कामासाठी गर्डर आल्यानंतर तत्काळ रेल्वेकडून मेगाब्लॉक मागून घ्यावा आणि हे काम येत्या महिन्याभरात पूर्ण करावे. या महामार्गावरील कशेळी येथील खाडीवरील पुलाचे काम ऑक्टोबरपर्यंत तर कळवा येथील खाडी पुलाचे काम जूनअखेर पूर्ण होणार आहे.

येत्या पावसाळ्यात ठाणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक सुरळीत व्हायला हवी, असे स्पष्ट निर्देश त्यांनी यावेळी दिले.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाची मिसिंग लिंक डिसेंबर अखेर होणार पूर्ण मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील मिसिंग लिंकच्या कामातील सर्वात अवघड असलेले व्हर्टिकल ब्रिजचे काम सध्या सुरू आहे. हे काम अत्यंत अवघड असल्याने ते नियोजनबद्धरित्या पूर्ण करावे असे त्यांनी सांगितले. तसेच हे काम येत्या डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण होणार असून त्यानंतर तो प्रवाशांसाठी खुला होईल.

## मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती अर्जाची ऑनलाईन प्रक्रिया १५ जूनपासून सुरु

मुंबई, दि. ३०: भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजना शासनाच्या महाडिबीटी प्रणालीद्वारे राबविण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता महाडीबीटी प्रणालीवर नविन तसेच नूतनीकरण अर्जासाठी ऑनलाईन स्वीकृती प्रक्रिया २५ जुलै २०२४ पासून सुरू करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील नूतनीकरण अर्ज तसेच २०२४-२५ मधील नविन अर्ज सादर करण्यासाठी ३१ मे २०२५ पर्यंत अंतिम मुदत आहे. त्यानुसार शिष्यवृत्तीसाठी नवीन व नुतनीकरणाचे अर्ज महाडीबीटी पोर्टलद्वारे १५ जूनपासून ऑनलाईन स्वीकारण्यात येतील.

सर्व महाविद्यालयांनी आपापल्या स्तरावर प्राप्त अर्जांची प्रथम प्राधान्याने पडताळणी करून ते ऑनलाईन पद्धतीने मंजूर करावेत. त्यानंतर संबंधित अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर यांच्या लॉगिनवर तत्काळ पाठवावेत.

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता अर्ज भरण्यासाठी वेळापत्रक पुढील प्रमाणे:**

कनिष्ठ महाविद्यालयातील अभ्यासक्रम इ. ११वी, १२ वीसाठीचे (सर्व शाखा, एमसीव्हीसी, आयटीआय आदी) नवीन अर्ज व नुतनीकरणाचे प्राप्त अर्ज १५ जून ते १५ ऑगस्ट २०२५ या मुदतीत महाविद्यालयांनी ऑनलाईन अग्रेषित करावेत. वरिष्ठ महाविद्यालयातील बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम प्रथम, द्वितीय व तृतीय सर्व शाखा कला, वाणिज्य, विज्ञान आदींसाठी नवीन व नुतनीकरणाचे अर्ज १५ जून ते १० सप्टेंबर २०२५ पर्यंत महाविद्यालयांनी ऑनलाईन अग्रेषित करावेत.

वरिष्ठ महाविद्यालयातील व्यावसायिक अभ्यासक्रम (प्रथम, द्वितीय, तृतीय अंतिम वर्ष (सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम अभियांत्रिकी, वैद्यकीय व्यवस्थापन अभ्यासक्रम, फार्मसी व नर्सिंग अभ्यासक्रम) आदींचे नवीन व नुतनीकरणाचे अर्ज महाविद्यालयांनी १५ जून ते १५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ऑनलाईन अग्रेषित करावेत.

## प्रगतीशील व प्रयोगशील शेतकऱ्यांशी कृषिमंत्र्यांनी साधला संवाद

**छत्रपती संभाजीनगर -** शेती हा व्यवसाय अधिकाधिक किफायतशीर व्हावा. कृषी विभागाचे सर्व निर्णय हे शेतकऱ्यांना मदत करणारे व हिताचे व्हावे. यादृष्टीने शेतकऱ्यांच्या सुचना ऐकून त्यास शासन प्राधान्य देत आहे, असे प्रतिपादन कृषी मंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी आज येथे केले.

कृषीविभागाच्या वतीने प्रगतीशील व प्रयोगशील शेतकऱ्यांचा परिसंवाद आयोजीत करण्यात आला होता. जालना रोडवरील शिवनेरी लॉन येथे हा कार्यक्रम पार पडला. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, नांदेड, लातूर, धाराशिव, हिंगोली या जिल्ह्यातील शेतकरी या परिसंवादात सहभागी झाले होते. विभागीय कृषी सहसंचालक छत्रपती संभाजीनगर व लातूर यांच्यावतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी कृषीमंत्री ड. कोकाटे हे होते. आ. अनुराधा चव्हाण, कृषी आयुक्त सुरज मांढरे, स्मार्टचे प्रकल्प संचालक डॉ. हेमंत वसेकर, संचालक आत्मा अशोक किरनळ्ळी , विभागीय कृषी सहसंचालक प्रकाश देशमुख तसेच सर्व जिल्ह्यांचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

परिसंवादात कापुस, मका, सोयाबीन,फळबाग , संरक्षित शेती, मसाला शेती, शेतकरी गट-उत्पादक कंपनी, अन्न प्रक्रिया उद्योग, शेती पुरक व्यवसाय, नैसर्गिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे गट तयार करण्यात आले होते.

## 'खजिन्याची शोधयात्रा' पुस्तकाच्या माध्यमातून देशाचे प्राचीन वैभव, इतिहास, संस्कृतीची मांडणी - देवेंद्र फडणवीस

**पुणे :** 'खजिन्याची शोधयात्रा' या पुस्तकाच्या लेखनासाठी प्रशांत पोळ यांनी व्यापक संशोधन आणि अभ्यास केला आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून देशाचे प्राचीन वैभव, इतिहास, संस्कृती मांडण्यात आली असल्याने शासनाच्या माध्यमातून हे पुस्तक अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. पुस्तकाच्या माध्यमातून ज्ञानाचा मोठा खजिना जनतेपर्यंत जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

प्रशांत पोळ लिखित 'खजिन्याची शोधयात्रा' या पुस्तकाच्या बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, मध्य प्रदेशचे सार्वजनिक बांधकाम मंत्री राकेश सिंह, मंदिर स्थापत्य व मूर्तीशास्त्राचे अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर, स्नेहल प्रकाशनचे रवींद्र घाटपांडे, राष्ट्रीय पुस्तक न्यासचे संचालक व पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे आदी उपस्थित होते.

प्रशांत पोळ यांचे पुस्तक लेखनासाठी अभिनंदन करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आपला इतिहास, परंपरा, संस्कृतीचे जतन करणे आपले कर्तव्य आहे. आपल्या समाजाचे तेज आणि आत्माभिमान संपविण्याचे काम परकियांनी केल्याने आपण पारतंत्र्यात गेलो. भारत समृद्ध देश होता, परकीय आक्रमकांनी आपल्या संपत्तीची लूट केली. आपले ज्ञान आणि संस्कृती ही आपली शक्ती आहे हे लक्षात घेऊन ज्ञानकेंद्रे उध्वस्त करणे, आपल्या संस्कृतीची प्रतिके जमिनदोस्त करणे आणि आपल्यावर त्यांची संस्कृती, परंपरेचा पगडा बसविण्याचे काम सातशेहून अधिक वर्ष चालले. त्यामुळे आपला इतिहास माहित नसलेल्या पिढ्या तयार झाल्या आणि भारत पारतंत्र्यात गेला.

## गुणवंत विद्यार्थी आणि अधिकाऱ्यांचा गौरव सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विकासात सर्वांचे योगदान आवश्यक

**सिंधुदुर्गनगरी -** सिंधुदुर्ग जिल्हा विकासाकडे घोडदौड करत आहे. साक्षरतेमध्ये राज्यातील पहिल्या पाच जिल्ह्यांमध्ये आपल्या जिल्ह्याचा समावेश आहे. दहावी आणि बारावीच्या निकालात कोकण विभागात आपला जिल्हा प्रथम क्रमांकावर आहे. प्रशासनातील अधिकारी देखील जिल्ह्याच्या विकासासाठी कटिबध्द आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्याला विकसित जिल्हा बनविण्यासाठी सर्वांचे योगदान आवश्यक असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री नितेश राणे यांनी केले.

जिल्ह्यातील इयत्ता बारावीच्या (विज्ञान, कला आणि वाणिज्य विद्याशाखा) व इयत्ता दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत प्रथम तीन क्रमांक पटकाविलेल्या विद्यार्थ्यांना आणि १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहिमेमध्ये कोकण विभागात सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या तालुका स्तरीय शासकीय कार्यालयातील अधिकाऱ्यांना पालकमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. माणिक दिवे, पोलिस अधीक्षक डॉ. मनोज दहिकर, अपर पोलिस अधीक्षक कृषिकेश रावले, अपर जिल्हाधिकारी शुभांगी साठे, निवासी उपजिल्हाधिकारी मच्छिंद्र सुकटे, उपजिल्हाधिकारी बालाजी शेवाळे, जिल्हा बँकेच अध्यक्ष मनीष दळवी, प्रभाकर सावंत तसेच विभाग प्रमुख उपस्थित होते.

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काटोल तालुक्यातील पाणंद रस्त्याची केली प्रत्यक्ष पाहणी

**नागपूर :** शेतकऱ्यांना आपल्या शेतातील उत्पादने वेळेत बाजारपेठेपर्यंत पोहचविता यावीत यासाठी त्यांच्या शेतापासून रस्त्याची नितांत आवश्यकता प्रत्येक भागात असते. शेतकऱ्यांची ही अडचण दूर व्हावी याउद्देशाने या योजनेअंतर्गत आपण जिल्ह्यात सर्व तेरा तालुक्यात एकूण ६४९ कामांना मंजूरी दिली असून यापैकी ४९१ कामांना कार्यारंभ आदेश दिले आहेत. जी कामे हाती घेतली आहेत ती गुणवत्तेची निकष लक्षात घेऊन पूर्ण करावीत, असे निर्देश महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

काटोल तालुक्यातील नायगाव ते खाणगाव या एक किलोमीटर पाणंद रस्त्याची पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्वत: पाहणी केली. राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याला किमान कच्चा रस्ता देण्याचे उद्दिष्ट आम्ही निश्चित केले असल्याचे सांगितले. यात शेतकरी कोणताही वाद न आणता स्वत: पुढे येत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. जिल्ह्यात या योजनेअंतर्गत भिवापूर तालुक्यात ३०, हिंगणा तालुक्यात ३१, कळमेश्वर तालुक्यात २७, कामठी तालुक्यात ५५, काटोल तालुक्यात ५८, कुही तालुक्यात ७३, मौदा तालुक्यात ७७, नागपूर तालुक्यात ४३, नरखेड तालुक्यात ५७, पारशिवनी तालुक्यात २३, रामटेक तालुक्यात ३२, सावनेर तालुक्यात ९२, उमरेड तालुक्यात ५१ अशी जिल्ह्यात एकूण ६४९ पाणंद रस्त्यांची कामे मंजूर करण्यात आली आहेत.

## नुकसानीचे पंचनामे तात्काळ पुर्ण करा; भरपाई आराखडे त्वरीत सादर करा - पालकमंत्री शंभूराज देसाई

**सातारा :** सातारा जिल्ह्यात २० ते २८ मे या दरम्यान एकूण सरासरी २९४ मिमी पर्जन्यमान झाले, मे महिन्यातील पावसाची ही टक्केवारी सर्वसाधारण ८८० टक्यांपेक्षा जास्त आहे. माण, खटाव, फलटण या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी होऊन घरे, रस्ते, पूल, पिके यांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे तात्काळ पूर्ण करुन भरपाईसाठीचे आराखडे त्वरीत सादर करावेत, असे निर्दे श पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली. यावेळी जिल्हाधिकारी संतोष पाटील, पोलीस अधीक्षक तुषार दोषी, उपवनसंरक्षक आदीती भारद्वाज, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता अरुण नाईक, जयंत शिंदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता राहूल अहिरे यांच्यासह पाटण, कराडचे उपविभागीय अधिकारी, विविध यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

माहे मे मध्ये जिल्ह्यातील ५० महसूल मंडळांमध्ये ६५ मिमीपेक्षा जास्त पर्जन्यमान झाले आहे असे सांगून पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, आतापर्यंत झालेल्या पंचनाम्यानुसार या पावसाने २८२ बाधित गावांमधील माण तालुक्यातील २७, फलटण तालुक्यातील १० आणि महाबळेश्वर तालुक्यातील १ अशा ३८ घरांची पूर्णत: पडझड झाली आहे. तर जिल्ह्यातील १८२६ घरांची अंशत: पडझड झाली असून १६ गोठे बाधित झाले आहेत. शेतपीकांचे नुकसानही मोठ्या प्रमाणात झाले असून ६ हजार १९० शेतकऱ्यांचे १ हजार ८६० हेक्टर बागायती पिकांखालील क्षेत्र तर १७ शेतकऱ्यांचे ८ हेक्टरहून अधिक फळपिकांखालील क्षेत्र बाधित झाले आहे. या कालावधीत माण येथील १ व्यक्ती पुराच्या पाण्यात वाहून जावून मयत झाला आहे तर खटाव मधील एक व्यक्ती विद्युत शॉक लागून मयत झाला आहे. १८ लहान, २२ दुधाळ, ओढकाम करणारी ३ जनावरे मयत झाली आहेत. तर १५० कोंबड्याही मयत झाल्या आहेत. अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे अद्यापही सुरु असून यंत्रणांनी युध्दपातळीवर काम करुन पंचनामे त्वरीत पूर्ण करावेत. भरपाईसाठीचे प्रस्ताव सादर करावेत.

## पुरोगामित्वाच्या नावाखाली संस्कृतीला शिव्या : मुख्यमंत्री



**पुणे** : 'धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली आपल्याकडे निधर्मी राज्याचे प्रयत्न झाले. त्यातूनच आपल्या प्रथा आणि परंपरांबद्दल गैरसमज निर्माण करण्यात आले. सनातन म्हणजे वाईट आणि खरे पुरोगामित्व म्हणजे संस्कृतीला शिव्या देणे असा विचार पुढे आला. त्यामुळे अशा अनेक पिढ्या आहेत, ज्यांना आजही इतिहासच माहिती नाही,' अशा शब्दांत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दांभिक पुरोगामित्वावर भाष्य केले.

प्रशांत पोळ लिखित 'खजिन्याची शोधयात्रा' या पुस्तकाचे प्रकाशन शुक्रवारी फडणवीस यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. मूर्तीशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मध्य प्रदेशचे लोकनिर्माण मंत्री राकेश सिंह, राष्ट्रीय पुस्तक न्यासाचे संचालक राजेश पांडे, स्नेहल प्रकाशनाचे रवींद्र घाटपांडे यावेळी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, 'भारतीय समाजाचे आत्मभान नष्ट करण्यासाठी आक्रमकांनी आपली ज्ञानकेंद्रे आणि प्रतिके जमीनदोस्त केली. गेली सातशे ते आठशे वर्ष त्यांच्या ज्ञानाचा पगडा आपल्यावर बसावा यासाठी पद्धतशीर प्रयत्न करत आहेत. त्यातूनच आपल्या काही पिढ्यांना चुकीचा इतिहास शिकविला गेला. म्हणून आता खरा इतिहास, परंपरा, ज्ञान आणि संस्कृती यांचे जतन करणे हे आपले कर्तव्य आहे.'

वेगवेगळ्या संशोधकांनी आपल्या संशोधनाने आपली संस्कृती भारताबाहेर गेल्याचा निष्कर्ष काढला आहे. जगातील अन्य संस्कृती नष्ट पावल्या आहेत. मात्र, पूर्वीपासून असलेली देशाची संस्कृती आजही अखंडित आहे. युरोपिय देशात जेव्हा संस्कृतीची संकल्पना स्पष्ट नव्हती तेव्हा आपली संस्कृती विकसित होती. संस्कृतासारखी भाषा विकसित होती, असेही फडणवीस यांनी सांगितले.

डॉ. गो.बं. देगलूरकर म्हणाले, 'समाज जसा बदलत गेला तशा आपल्या संस्कृतीतील स्मृती बदलत गेल्या. मात्र, आज या संस्कृतीची समृद्धी आपण विसरलो आहोत. ब्रिटीशांनी तर आपले ज्ञान संपविण्यासाठी अनेक प्रयत्न केले. स्वातंत्र्यानंतर तरी आपल्या विद्यार्थ्यांसमोर आपली संस्कृती येईल, असे वाटले होते. पण पहिल्या दोन शिक्षणमंत्र्यांना आपल्या संस्कृतीचे सोयर नव्हे तर सुतकच होते. आता मात्र तो अभ्युदय होईल, याची मला खात्री आहे. विनया देसाई यांनी सूत्रसंचालन केले. तर, स्नेहल प्रकाशनचे रवींद्र घाटपांडे यांनी आभार मानले.

## आम्ही ऐतिहासिक बदलाचे साक्षीदार! 'एनडीए'च्या १४८ व्या तुकडीची प्रातिनिधिक भावना

**पुणे** : 'पुरुषांचे वर्चस्व असलेली ही अकादमी मुलींच्या प्रवेशाने एकात्मिक झाली. हा ऐतिहासिक बदल प्रथमत: आमच्या तुकडीने अनुभवला,' अशी प्रातिनिधिक भावना कॅप्टन प्रिन्सकुमार कुशवाह या छात्राने व्यक्त केली. मूळचा उत्तर प्रदेशातील मथुरा येथील प्रिन्सकुमारने संगणकशास्त्र शाखेत पहिला क्रमांक पटकावला. 'एनडीए'मधील तीन वर्षे ही खूप संस्मरणीय, आव्हानात्मक होती. या तीन वर्षांत खेळापासून नेतृत्वापर्यंत अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. आमच्या तुकडीने अकादमी बदलताना पाहिली,' अशी त्याची भावना होती.

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या (एनडीए) १४८ व्या तुकडीतील विविध शाखांमध्ये अग्रस्थान मिळवलेल्या चार छात्रांपैकी तीन छात्रांना लष्करी पार्श्वभूमी आहे, तर एक छात्र शेतकरी कुटुंबातून आलेला आहे.

प्रिन्सकुमारचे वडील लालचंद कुशवाह लष्कराच्या तोफखाना विभागातून नायब सुभेदार म्हणून निवृत्त झाले आहेत. एक बहीण दंतवैद्यकीय पदवीचे शिक्षण घेत आहे, तर दुसरी बहीण लष्करात येण्यासाठी चेन्नईतील ऑफिसर्स ट्रेनिंग कॅडमीमध्ये (ओटीए) प्रशिक्षणार्थी आहे. 'मुलगा तीन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करून सैन्य दलात दाखल होत आहे, हा अविस्मरणीय प्रसंग आहे.

एनडीएच्या १४८व्या तुकडीतील ३३९ छात्रांना जवाहरलाल नेहरू विद्यापीठाची पदवी प्रदान करण्यात आली. त्यात ८४ छात्रांना विज्ञान शाखेची, ८५ छात्रांना संगणकशास्त्र, ५९ छात्रांना कला शाखेची, तर १११ छात्रांना बी. टेक. पदवी देण्यात आली. याच कार्यक्रमात विविध शाखांमध्ये अग्रस्थान पटकाविलेल्या छात्रांना गौरविण्यात आले.

कला शाखेत पहिली आलेल्या कॅप्टन श्रिती दक्षचे वडील योगेशकुमार दक्ष हवाई दलातून विंग कमांडर म्हणून निवृत्त झाले आहेत. ते म्हणाले, 'माझी धाकटी मुलगीही सैन्यात दाखल होत असल्याचा आनंद आहे. मी ज्या स्क्वाड्रनमध्ये ३० वर्षांपूर्वी होतो, त्याच स्क्वाड्रनचा तीही भाग झाली आहे. तिने माझ्यापेक्षा जास्त चांगली कामगिरी केली आहे. त्यामुळे मला तिचा अभिमान वाटतो.'

विज्ञान शाखेत प्रथम क्रमांक पटकाविलेला कॅप्टन लकीकुमार बिहारचा आहे.

## पुणे महापालिका आयुक्त डॉ. भोसले सेवानिवृत्त

**पुणे** : महापालिकेच्या ७५ वर्षांच्या इतिहासात आयुक्त म्हणून सेवानिवृत्त होण्याचा मान विद्यमान आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांना मिळाला आहे. महापालिका आयुक्त भोसले यांच्या कार्यालयात नागरिकांना सहज प्रवेश मिळत होता. ते नागरिकांचे प्रश्न समजून घेत होते. त्यामुळे ते खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांचे आयुक्त होते, अशा भावना महापालिकेतील अधिकाऱ्यांनी व्यक्त केल्या.

महापालिका आयुक्त डॉ. भोसले आज (शनिवारी) पुणे महापालिका आयुक्तपदावरून सेवानिवृत्त होत आहे. त्यांच्या सेवापूर्तीनिमित्त शुक्रवारी महापालिकेत निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., ओमप्रकाश दिवटे, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, डॉ. राजेंद्र भोसले यांचे कुटुंबीय यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमात अधिकाऱ्यांनी भावना व्यक्त केल्या.

महापालिकेतून आयुक्तपदावरून सेवानिवृत्त होत असलेल्या डॉ. भोसले यांनी राज्यात २५ ठिकाणी ३२ वर्षे काम केले. पुणे महापालिका आयुक्त म्हणून ते गेली सव्वा वर्षे काम करीत आहेत. त्यांच्या कार्यालयात कोणालाही सहज प्रवेश मिळत होता, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

माजी महापौर दत्तात्रय धनकवडे, भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, मनसेचे माजी नगरसेवक बाबू वागस्कर, माजी सभागृह नेते श्रीनाथ भिमाले, गणेश बिडकर, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., ओमप्रकाश दिवटे, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, अनिरुद्ध पावसकर, प्रतिभा पाटील, मुख्य विधी सल्लागार निशा चव्हाण, आयुक्त डॉ. भोसले यांच्या पत्नी दीपाली भोसले यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले होते. सत्काराला उत्तर देताना डॉ. राजेंद्र भोसले यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या.

## विवाहविषयक संकेतस्थळावरून झालेल्या ओळखीतून महिलेची फसवणूक

**पुणे** : विवाहविषयक संकेतस्थळावरून झालेल्या ओळखीतून एका महिलेची सात लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी सहकारनगर पोलिसांनी एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. याप्रकरणी प्रतीक संजय देवरे (वय ३८, रा. जिजामाता चौक, बालाजीनगर, धनकवडी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका महिलेने सहकारनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी देवरे याची विवाहविषयक संकेतस्थळावरून एका महिलेची ओळख झाली होती. देवरेने महिलेला शेअर बाजारात पैसे गुंतविल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष दाखविले होते. त्यानंतर त्याने महिलेकडून वेळोवेळी सात लाख २० हजार रुपये घेतले. त्यानंतर त्याने महिलेला परतावा दिला नाही. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस उपनिरीक्षक काळे तपास करत आहेत.

विवाहविषयक संकेतस्थळावरून झालेल्या ओळखीतून फसवणुकीचे प्रकार वाढीस लागले आहेत. काही महिन्यांपूर्वी विवाहविषयक संकेतस्थळावरून एका डॉक्टर तरुणीची फसवणूक करण्यात आली होती. फसवणूक झाल्याने तरुणीला धक्का बसला. तिने बिबवेवाडी भागातील एका दवाखान्यात विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केली होती.

## चऱ्होलीतील प्रस्तावित नगररचना योजनेला स्थगिती



**पिंपरी** : वाढत्या विरोधानंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेने चिखली, कुदळवाडीतील नगररचना योजना रद्द केल्यानंतर आता चऱ्होलीतील प्रस्तावित नगररचना योजनेलाही (टीपी) स्थगिती दिली आहे.

सुनियोजित विकास करण्यासाठी महापालिकेने चऱ्होली येथील काही क्षेत्रावर नगररचना योजना राबवण्याचा इरादा १५ मे रोजी जाहीर केला होता. स्थानिकांनी, तसेच लोकप्रतिनिधींनी नगररचना योजना राबविण्यास विरोध दर्शविला होता. भाजप आमदार महेश लांडगे यांनी या योजनेला विरोध केला.

महापालिकेच्या प्रवेशद्वारासह चिखलीत तीव्र आंदोलन केले. शहराच्या स्थापनेपासून भूमिपुत्रांवर अन्याय झाला आहे. सुरुवातीला एमआयडीसी, त्यानंतर पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण आणि महापालिका हद्दीत समावेश झाल्यानंतरही विविध आरक्षणांसाठी शेतकऱ्यांची जमीन घेतली आहे. नगररचना योजनेच्या माध्यमातून शेतकरी भूमिहीन होतील. संपूर्ण शहराचा सुधारित विकास आराखडा (डीपी) तयार होत असताना नगररचना योजनेचा (टीपी) आग्रह कशासाठी, असा सवाल आमदार लांडगे यांनी उपस्थित केला होता. अखेरीस प्रशासनाने नगररचना योजनेला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला.

## गोळीबार करताना नेम चुकला

**पुणे** : हडपसरमधील मांजरी भागात गुरुवारी रात्री गोळीबार झाल्याची घटना घडली. दोन गटांतील वादातून कोयता आणि देशी बनावटीचे पिस्तूल घेऊन पाठलाग करताना प्रतिस्पर्धी टोळीतील एकावर गोळीबार करताना नेम चुकला. गोळीबारात एक तरुण जखमी झाला. मावसभावाच्या खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी हडपसर पोलिसांनी एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

वैभव श्रवण गवळी (वय २०, रा. हडपसर ) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी वैभव गवळी याच्यासह सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पुष्पा कुचेकर (वय ४०) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी सुमीत खवळे याला ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुष्पा कुचेकर यांचा मुलगा स्वप्नील उर्फ बिट्ट्या आणि सुमीत खवळे यांच्यात वाद आहेत.

गुरुवारी रात्री आठच्या सुमारास सुमीत खवळे, त्याचा मावसभाऊ वैभव गवळी आणि साथीदारांनी कुचेकर याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. दुचाकीवरून खवळे, गवळी आणि साथीदार कुचेकरचा पाठलाग करत होते. खवळे याच्याकडे देशी बनावटीचे पिस्तूल होते, तसेच साथीदारांकडे कोयते होते.

## पुणे मेट्रोच्या विस्ताराला गती मिळणार, मुरलीधर मोहोळ व केंद्रीय मंत्री मनोहर लाल खट्टर यांची भेट

**पुणे** : वनाज ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली या मेट्रोच्या विस्तारित टप्प्यांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी देणे तसेच खराडी-हडपसर-स्वारगेट-खडकवासलाबरोबरच नळ स्टॉप-वारजे-माणिक बाग या टप्प्यांना पब्लिक इन्व्हेस्टमेंट बोर्डाची (पीआयबी) मान्यता मिळविण्यासंदर्भात केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केंद्रीय नगरविकास मंत्री मनोहरलाल खट्टर यांची दिल्ली येथे भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

पुणे मेट्रोचे दोन्ही मार्ग पूर्ण क्षमतेने सुरू असताना वनाज ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली या मेट्रो मार्गाचे विस्तारीकरण प्रस्तावित आहे. यासाठी महामेट्रोने सविस्तर विकास आराखडा तयार केला असून, याला राज्य सरकारचीदेखील मंजुरी मिळालेली आहे. तसेच पब्लिक इनव्हेसमेंट बोर्डाचीही मान्यता ११ मार्च २०२५ रोजी मिळाली असून, आता केंद्रीय मंत्रिमंडळाची अंतिम मंजुरीची प्रतीक्षा आहे. हा प्रस्ताव लवकरात लवकर केंद्रीय मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात यावा, अशी मागणी मोहोळ यांनी खट्टर यांच्याकडे केली.

## 'एमआयडीसी'साठी अग्निशमन केंद्र, पिंपरी महापालिकेकडून २२ कोटींची निविदा

**पिंपरी** : पिंपरी, चिंचवड आणि भोसरीतील औद्योगिक विकास महामंडळासाठी (एमआयडीसी) पिंपरी-चिंचवड महापालिका स्वतंत्र अग्निशमन केंद्र उभारणार आहे. हे केंद्र एमआयडीसीने दिलेल्या टाटा मोटर्सच्या मालवाहतूक प्रवेशद्वारासमोरील मोकळ्या भूखंडावर (प्लॉट क्रमांक एफ-टू ब्लॉक) येथे उभारण्यात येणार आहे. त्यासाठी महापालिकेने २२ कोटी ८४ लाख ७५ हजार रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे.

सद्य:स्थितीत पिंपरी-चिंचवड एमआयडीसीत बहुउद्देशीय कंपन्यांना सुटे भाग पुरविणारे सुमारे १६ हजार सूक्ष्म, लघुउद्योग सुरू आहेत. या १६ हजार उद्योगांमध्ये सात लाख कामगारांच्या हाताला रोजगार मिळाला आहे. लघु उद्योग वाहनांचे सुटे भाग (ऑटोमोबाइल्स पार्टस) संरक्षण विभागाला लागणारे सुटे भाग, प्रेस पार्ट, रबर, प्लास्टिक, इंजिनीअरिंग कंपन्यांसाठीचे फॅब्रिकेशन उत्पादन करतात. शहरातील मोठ्या उद्योगांसह विदेशातील उद्योगांना हे सुटे भाग पुरविले जातात.

एमआयडीसीतील एखाद्या कंपनीला आग लागल्यास संत तुकारामनगर येथील अग्निशमन केंद्रावर अवलंबून रहावे लागत होते. हे अंतर लांब असल्याने बंब येण्यास विलंब होत असल्याने उद्योजकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत होते. उद्योगांसाठी एमआयडीसी परिसरात स्वतंत्र अग्निशमन केंद्र असावे, यासाठी एमआयडीसीने भोसरी येथील प्लॉट क्रमांक एफ-टू ब्लॉक येथे भूखंड राखीव ठेवला होता. या भूखंडावर अग्निशमन केंद्र उभारण्याची पिंपरी-चिंचवड लघु उद्योग संघटनेची अनेक वर्षांपासून मागणी होती. यासंदर्भात उद्योग मंत्र्यांकडे बैठका झाल्या. त्यानंतर महापालिकेने हालचाली केल्या. अग्निशमन केंद्र उभारण्यासाठी मे. एनव्हायरोसेफ कन्सल्टंट यांची नेमणूक केली. त्यानंतर महापालिकेने २२ कोटी ८४ लाख ७५ हजार ५७६ रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे.

### चार मजल्यांचे केंद्र

अग्निशमन केंद्र चार मजल्याचे असणार आहे. तळमजल्यावर पाच अग्निशमन वाहनांसाठी वाहनतळ, नियंत्रण, मीटर खोली, मटेरियल स्टोअर, उद्वाहक (लिफ्ट) जिना, पहिल्या मजल्यावर पुरुष आणि महिला जवानांसाठी आराम खोली, दुसऱ्या मजल्यावर संगणक कक्ष, प्रशिक्षण हॉल, ग्रंथालय, तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यावर दोन सदनिका असणार आहेत.